CNR Number MHNG09-002912-2015

नियमीत दिवाणी दावा क्र.५६/२०१६ निशाणी क्र.४६

प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपास शपथेवर सुरू :-

०७. माझ्या पुराव्याप्रतिज्ञालेखातील संपूर्ण मजकूर हा माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीलेला असून तो खरा आणि बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. मी या प्रकरणात फेरफार पत्रक नोंदणी क्र.४३५ ची प्रमाणित प्रत दाखल केली असून त्याला निशाणी क्र.४९ देण्यात येते. तसेच फेरफार पत्रक क्र. ४३४ ची प्रमाणीत प्रत दाखल केली असून तिला निशाणी क्र.५० देण्यात येते. फेरफार पत्रक क्र. ४३८ ची प्रमाणीत प्रत दाखल केली असून तिला निशाणी क्र.५१ देण्यात येते.फेरफार पत्रक क्र. ४२८ ची प्रमाणीत प्रत दाखल केली असून तिला निशाणी क्र.५२ देण्यात येते.

उलट तपास वादीचे वकील श्री. एस. एम. पांडे तर्फे :-

०८. हे खरे की, माझ्या आजोबाचे नाव महादेव भिवाजी इंगोले आहे. हे खरे नाही की, त्यांचा मृत्यू सन १९८० मध्ये झाला. त्यांच्या मृत्यूचा दाखला माझ्याकडे उपलब्ध नाही. हे खरे की, माझ्या आजीचे नाव रंगूबाई असून हे मला निश्चित सांगता येत नाही की त्या सन २००८ मध्ये वारल्या किंवा कसे. हे खरे की, महादेव यांना मनोहर आणि नामदेव ही दोन मुले आहेत. हे मला सांगता येत नाही की, दोन्ही मुले माझ्या आजोबाच्या हयातीत विभक्त राहत होते किंवा कसे. हे खरे नाही की, दाव्यातील परिशिष्ट अ वडीलोपार्जीत मालमत्ता होती. हे खरे की, दाव्यातील परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेल्या मालमत्तेपैकी कुठलीही मालमत्ता माझ्या वडीलांनी विकत घेतली नव्हती. हे खरे की, परिशिष्ट अ मधील दाव्यातील मालमत्त ही माझ्या वडीलांना आजी आजोबाकडून मिळाली आहे. हे खरे नाही की, दाव्यातील परिशिष्ट ब मधील नमुद केलेली मालमत्ता ही वडीलोपार्जीत आहे.

प्रश्न : परिशिष्ट ब मधील मालमत्ता तुमच्या वडीलांनी बांधली याबद्दल तुमच्याकडे काही दस्तऐवज पुरावा उपलब्ध आहे का ?

उत्तर : दाव्यामधे मी घर आकारणीचा कर याबद्दलचे पावत्या दाखल केले आहेत.

०९. सदरच्या पावत्या मी वकीलांना दिल्या होत्या. त्या अभिलेखावर माझ्या

DISTRICT COURT NAGPUR

वकीलांनी का दाखल केल्या नाहीत, याचे कारण मी सांगू शकत नाही. हे खरे की, सदरचे घर माझ्या वडीलांनी विकत घेतले आणि बांधले, असे दाखविणारा कुठलाही दस्तऐवज सदर पावत्याव्यतिरिक्त माझ्याकडे नाही. हे खरे नाही की, परिशिष्ट ब मध्ये नमुद केलेले घर सुध्दा वडीलोपार्जीत मालमत्ता नाही. हे खरे की, माझे वडील, वादी आणि प्रतिवादी यांचे एकत्र कुटुंब होते. हे खरे की, या एकत्र कुटूंबाचे आजपर्यंत कुठलेही हिस्से वाटण्या झाल्या नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, शेतीच्या वाटण्या झाल्या आहेत. साक्षीदार पुन्हा आता सांगतो की, वाटण्या झालेल्या नाहीत.

१०. हे खरे की, वाद मिळकतमध्ये माझा वादीचा प्रतिवादी क्र.३ व माझ्या वडीलांचा प्रत्येकी १/५ हिस्सा होता. हे खरे की, वादीचे शिक्षण वर्ग दहावी पर्यंत पाटणसांवगी येथे झाले आहे. हे खरे नाही की, त्यानंतर पूढील शिक्षण त्याने नागपूरला केले व नंतर तो औरंगाबाद येथे नोकरी करण्यास गेला. साक्षीदार स्वतः सांगतो की, त्याने आधी मौदा येथे नाकरी केली. हे खरे नाही की, माझे वडील यांना लकवाचा आजार झाला म्हणून ते वारले. हे खरे नाही की, मरणापूर्वी पुष्कळ वर्ष आधी ते अंथरुणावरच होते. हे खरे नाही की, त्यांच्य मृत्यूच्या समयी त्यांना हलने वगैरे जमत नव्हते व त्यांच्या सर्व विधी ह्या अंथरुणावरच होत असायच्या. हे खरे नाही की, मरणाच्या एक ते दिड वर्ष अगोदर त्यांची स्मृती गेली होती व ते ओळख विसरले होते. हे खरे नाही की, वादी हा जसा त्याला वेळ मिळायचा तसा तो वडीलांना पाटणसावंगी येथे भेटण्यास यायचा. हे खरे नाही की, माझे संपूर्ण शिक्षण आणि वडीलांचा आजारपणाचा खर्च हा वादीनेच केला.

११. लेखी बयान देतांना मी माझ्या वकीलांना दावा मिळकत सर्वे क्र.१९ ही फक्त माझ्या वडीलांना वाटणीमध्ये मिळाली होती ही बाब सांगितली होती. तसेच, सदर मालमत्तेमध्ये माझ्या आत्यांनी त्यांचा असलेला हक्क हक्क सोडल्याचा लेख देवून सोडला होता हे सुध्दा मी माझ्या वकीलांना सांगितले होते. तसेच, त्यामुळे सर्वे क्र.१९ ची संपूर्ण मालकी माझ्या वडीलांना मिळाली याबद्दल सुध्दा मी माझ्या वकीलांना सांगितले होते. तसेच, सर्वे क्र.५ माझ्या आजीला वाटणीमध्ये मिळाला हे सुद्धा मी माझ्या वकीलांना सांगितले होते. परंतु, ह्या सर्व बाबी माझ्या लेखी बयानामध्ये का नमुद केले नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. माझ्या आजीने



DISTRICT COURT NAGPUR

माझ्या वडीलांना मृत्यू पत्र करून दिले असेल. त्याचे विवरण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की असे कुठलेही मृत्यूपत्र माझ्या आजीने करून दिले नव्हते. मृत्यूपत्र हे लेखी होते. तिने सदरचे मृत्यूपत्र तिच्या मरणाअगोदर किती दिवस अगोदर करून ठेवले होते, हे मी निश्चित सांगू शकत नाही. सदर मृत्यूपत्र अभिलेखावर दाखल न करण्याचे कारण की त्याची आवश्यकताच पडली नाही. माझ्या पुराव्या प्रतिज्ञालेखातील परिच्छेद क्र.२ मधील मजकूर मी माझ्या वकीलांना जबाब तयार करतेवेळी सांगितलेला होता. परंतू, माझ्या जबाबामध्ये त्याबद्दल का नमुद केले नाही, याचे कारण मी सांगू शकत नाही. हे खरे नाही की, परिच्छेद क्र.२ मध्ये नमुद केलेल्या बाबी घडलेल्याच नाही. त्यामुळे, त्याबद्दल माझ्या जबाबामध्ये नमुद केलेले नाही. परिच्छेद क्र.५ मधील माझ्या पुराव्यातील मजकूर मी जबाब तयार करताना माझ्या वकीलांना सांगितला होता. परंतू, सदरच्या बाबी माझ्या जबाबामध्ये का नमुद नाही, याचे कारण मी सांगू शकत नाही. तसेच, परिच्छेद क्र.६ मधील मजकूर सुध्दा मी जबाब तयार करतेवेळी वकीलांना सांगितला होता. परंतू, सदरच्या बाबी माझ्या जबाबामध्ये का नमुद नाही, याचे कारण मी सांगू शकत नाही. हे खरे नाही की, आम्ही प्रतिवादींनी माझ्या वडीलांच्या प्रकृतीचा फायदा घेवून आम्ही तथाकथित मृत्यूपत्र खोटे तयार करून घेतले. हे मला सांगता येत नाही की, माझ्या वडीलांना १/५ हिस्साच्या वर मृत्यूपत्र तयार करण्याचा अधिकार नव्हता किंवा कसे. साक्षीदार सांगाते की, हे माझे वडीलच सांगू शकते. हे खरे नाही की, दावा मिळकतीध्ये प्रतिवादीचा १/४ हिस्सा आहे. हे खरे की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा दाखल करण्यापूर्वी आम्हाला त्यांच्या वकीलांमार्फत नोटीस पाठविली होती. सदर नोटीसचा जवाब आम्ही दिला होता. परंतू सदर जबाबाची प्रत मी अभिलेखावर का दाखल केली नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे खरे नाही की, मी कुठलाही जबाब दिला नाही त्यामुळे सदरचा नोटीस जबाब मी अभिलेखावर दाखल केला नाही.

प्रश्न : वादीला नोटीस पाठविण्यासाठी ५,०००/– रुपये खर्च आला ?
उत्तर : मी काय करू.

१२. हे खरे की, वाद मिळकतीतील घरामध्ये मी राहत आहे आणि वाद मिळकतीतील शेती आम्ही कसत आहे.

प्रश्न : या वादमिळकतीतील उत्पन्न वादीला आजपर्यंत आम्ही दिलेले नाही ?

उत्तर : ते माझ्या आईला माहीत.

१३. हे खरे की, मृत्यूपत्राच्या आधारे झालेल्या फेरफारची नोटीस वादीला मिळाली व त्यावर वादीने आक्षेप घेतला होता. हे खरे की, सदर फेरफारच्या नोंदीचा आदेश तहसिलदार यांनी आमच्या बाजून केला त्यावर वादीने उपविभागीय अधिकारी यांच्याकडून अपिल दाखल केली. हे खरे नाही की, वादीला दावा मिळकतमध्ये अधिकार असल्यामुहे त्याला नोटीसचा आलेला खर्च, नुकसान भरपाई व दावा मिळकतीमध्ये त्याचा असलेला हिस्सा मिळण्याचा अधिकारी आहे. हे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले आणि आज खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.

फेरतपास काहीही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत. माझे समक्ष

(ज. शं. कोकाटे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सावनेर.

दिनांकः१९.०३.२०१९ जिल्हा–नागपुर

DISTRICT COURT NAGPUR

# C E R T I F I C A T E

"I affirm that the contents of this P. D. F. File of Evidence are word to word as per original Evidence."

**Name of Stenographer : N. B. Payade**

DISTRICT COURT
NAGPUR